**<u>नि.क्र. ९६ च्या आदेशावरुन वादी तर्फे सा.क्र.२</u>**

**<u>मी शपथेवर कथन करतो की,</u>**

**नाव** – निवास वसंत पाटील

**वय** – ४६, वर्ष, **व्यवसाय** – निमतानदार,

**नेमणूक** – उपअधिक्षक, भूमिअभिलेख, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**<u>वादीतर्फे सरतपास – श्री. ए. जी. देशपांडे, वकील.</u>**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. मी सन २०१८ ते २०२३ पर्यंत आजरा उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयात निमतानदार म्हणून कार्यरत होतो. मी यापूर्वी न्यायालयीन आयुक्त म्हणून कामकाज केलेले आहे.

**२**. आमच्या कार्यालयास सदर दाव्यात मोजणी करणेबाबत न्यायालयाचे पत्र मिळले होते. त्यासोबत न्यायालयाच्या आदेशाची प्रत मिळाली होती. सदर प्रकरणात माझी निमतानदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मी मोजणीची तारीख दि.१२/०६/२०२३ निश्चित करुन त्याबाबत या दाव्यातील वादी व प्रतिवादींना मोजणीच्या नोटीसा पाठविल्या होत्या. आता मला नोटीसीची आमच्या कार्यालयाची ऑनलाईन प्रत दाखवली तिला **नि.क्र.९८** देण्यात येतो. आता मला सदर नोटीस वादीला मिळाल्याबाबतची पोस्टाची पोहोच पावती दाखवली तिला **नि.क्र.९९** देण्यात येतो. आता मला प्रतिवादी क्र. १ ने सदर नोटीस घेण्यात नकार दिल्यामुळे परत आलेल्या सीबंद लखोटा दाखवला तिला नि.क्र.१०० देण्यात येतो.

**३.** मी दि.१२/०६/२०२३ रोजी मौजे पेरणोली येथे मोजणीसाठी गेलो होतो. त्यावेळी वादी स्वतः, प्रतिवादी क्र.१ व २ , लगत जमीनधारक मानसिंग चव्हाण आणि वादीने बोलविलेले दोन साक्षीदार महादेव चांदेकर व बाळासाहेब देसाई हे हजर होते. मी त्यांना कशासाठी आलो आहे याबाबत समजावून सांगून त्यांना दाखविलेल्या वहिवाटीप्रमाणे मोजणी काम केले होते. मी जुने ग्रामपंचायत मिळकत नं.४७६ व ४७० ज्याशी अनुक्रमे नवीन मिळकत क्रमांक ५३७ व ५३१ यांची मोजणी केली होती.

**४.** मी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दोन फुट रुंदीच्या बोळीमधील वादी व प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण मोजले होते. वादीने सदर बोळीमध्ये भिंतीच्या संरक्षणासाठी दोन

जागेवरती पत्रा घातलेला होता. मी त्याचे मोजमाप केले होते त्याप्रमाणे वादीने एका ठिकाणी ०.३० चौ.मी. रुंदी x ६.८५ चौ.मी. लांबीचे आणि दुस–या ठिकाणी ०.३० चौ.मी.रुंदी x ६.७५ चौ.मी. लांबीचे अतिक्रमण केले होते. त्या बोळीमध्ये प्रतिवादींनी तीन ठिकाणी खिडकीसाठी सिमेंटची छप्परी काढून अतिक्रमण केले होते. त्याप्रमाणे प्रतिवादींनी पहिल्या ठिकाणी ०.३५ चौ.मी. रुंदी x १.८५ चौ.मी. लांबीचे, दुस–या ठिकाणी ०.३५ चौ.मी. रुंदी x १.२० चौ.मी. लांबीचे आणि तिस–या ठिकाणी ०.३५ चौ.मी. रुंदी x २.०५ चौ.मी. लांबीचे सिमेंटची छप्परी काढून अतिक्रमण केल्याचे आढळले होते. तसेच त्यांनी दक्षिणेला सिमेंटची संरक्षक भिंत उभी केल्यामुळे बोळीचे मोजमाप करता आले नाही.

**५.** प्रतिवादींनी अतिक्रमण केल्यामुळे बोळीचे मोजमाप घेता आले नाही. प्रतिवादींनी दक्षिण बाजूला ६.२० चौ.मी. संरक्षक कटडा बांधून स्वतःसाठी येण्याजाण्याकरीता रस्ता ठेवलेला आहे. प्रतिवादींनी केलेल्या संरक्षक भिंतीच्या बांधकामामुळे बोळीमधून ये–जा करता येत नव्हते. मी केलेल्या मोजमापाप्रमाणे नकाशा तयार केला होता. मी त्या नकाशाची मुळ प्रत आज सोबत आणलेली असून त्याची ब प्रत न्यायालयात हजर केलेली आहे. आता मला मी न्यायालयात हजर केलेली नकाशाची ब प्रत दाखवली. त्यातील मजकूर नकाशाच्या अ प्रतिप्रमाणे बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०१** देण्यात येतो.

**६.** मी मोजणी करुन झाल्यानंतर वादी व प्रतिवादींचे जबाब त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदवले होते. आता मला त्यांचे जबाब दाखवले, ते माझ्या हस्ताक्षरात लिहीण्यात आलेले असून त्यावर माझी, वादी व प्रतिवादी आणि साक्षीदारांच्या स्वाक्ष–या आहेत. त्यातील वादीच्या जबाबाला **नि.क्र.१०२** व प्रतिवादी याच्या जबाबाला **नि.क्र.१०३** देण्यात येतो. मी मोजणी करुन जबाब घेतलेले असून त्यास वादी अथवा प्रतिवादींनी आक्षेप घेतला नव्हता. मी तयार केलेला अहवाल कार्यालयात सादर केल्यानंतर तो न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे. आता मला त्याचे पत्र दाखवले त्यास नि.क्र.७१ देण्यात आलेले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादीं तर्फे उलटतपास – श्री. डी.जे.देसाई वकील</u>**

**(प्रतिवादीने नि.क्र.१०४ प्रमाणे दिलेला मुदतीचा अर्ज नामंजूर केल्यामुळे स्वतः**

**उलटतपास घेतला आहे. )**

**७.** मी दिलेल्या नोटीसा प्रतिवादींना पोहोचलेल्या नाहीत. मी मोजणीपूर्वी ग्रामपंचायत कार्यालयाला माहिती दिली नव्हती. मोजणी दरम्यान ग्रामपंचायत सदस्य, सरपंच अथवा शिपाई हजर नव्हते. त्यांना नोटीस अथवा माहिती दिले नसल्यामुळे ते हजर नव्हते. मी वादीच्या घराची लांबी रुंदी मोजली असून त्याच्या घराची उत्तरेकडील रुंदी ५.४० चौ.मी. (१७.७ चौ.फुट ) आणि दक्षिणेकडील ६.२० (२०.३ चौ.फुट ) चौ.मी. आणि त्याच्या घराची पश्चिम बाजूची लांबी १५.८० चौ.मी.(५१.८ चौ.फुट ) आहे. मला त्याच्या घराच्या दक्षिण बाजूला संरक्षक कटडा आणि खिडकीवरती सिमेंटचे छप्पर असल्यामुळे मोजणी करता आली नाही.

८. मी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे केवळ दोन फुट बोळीचे मोजमाप केले होते. मी त्यातील पत्र्याचे शेड, खिडक्याचा सज्ञा मोजून अतिक्रमण झाल्याचे नमूद केले आहे. माझ्या मोजणीमध्ये वादी व प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे आढळून आले.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २४.११.२०२५.

(आर. पी. थोरे)

आजरा.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.